Review Of Research

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 3 | December - 2016

# सृजनरंग या पुस्तकातील गद्य वेच्याविषयीचे चिंतन


**प्रा.डॉ. इ.जा. तांबोळी**
**प्रमुख मराठी विभाग, सोशल कॉलेज, सोलापूर.**

**प्रास्ताविक :-**
बी.ए. भाग एक च्या नवीन अभ्यासक्रमामध्ये सृजनरंग या पुस्तकात सत्र दुसरे यामधील गद्य वेच्यांचा अभ्यास या शोध निबंधात केलेला आहे. रयतेचा वाटा रयतेशी द्यावा, आशा निराशेचे क्षण, अक्षराचं बेट, वालचंद म्हणजे एक संस्था, प्राण्यांचे गोकुळ असे हे पाच गद्य वेच्ये समाविष्ट आहेत. या पाच प्रकरणाविषयीचे चिंतन या शोध निबंधात केले आहे.

या गद्य वेच्यांचे आशयानुसारी वर्गीकरण केले आहे. या प्रकरणात कोणकोणते प्रश्न निर्माण झाले आहेत. कोणता संस्कार अनुभव विद्यार्थ्यांवर होणार आहे? कोणत्या साहित्यिक जाणिवा या लेखातून प्रकटलेल्या आहेत? अशा विविध प्रश्नांचा मागोवा या शोध निबंधात घेण्यात आलेला आहे.

**१. गद्यवेच्यांचा आशय :-**
गद्य वेच्यात कोणत्या प्रकारचा आशय रेखाटलेला आहे. याचा थोडक्यात परामर्श इथे घेण्यात आलेला आहे.

**१.१ रयतेचा वाटा रयतेशी द्यावा :-**
हा पाठ छत्रपती शिवाजी महाराजांनी रामाजी अनंत सुभेदार यांना लिहिलेले हे पत्र आहे. या पत्रात छ. शिवाजी



महाराजांनी प्रशासन कसे चालावे या विषयी मार्गदर्शन केलेले आहे.

सुभा दिलेला आहे. नीट वागावे, चोरी करू नये, साहेबांचे काम इमामे इतबारे करावे. तशी शपथ घेतली आहे. भाजीच्या देणची अपेक्षा न करता योग्य ते वर्तन करावे. वसुलीच्या कामात हररोज लावणी, संजवणी, उगवणी इ. कामे करावी लागतात. ती वेळेवर करावीत. सर्व काम साहेबांच्या विचाराने करावे. रयतेवर अन्याय केला तर साहेब नाराज होतील. रयतेचा वाटा रयतेला मिळावा. रयतेकडून पैसे न घेता त्या बदल्यात वस्तू घ्याव्यात. या वस्तू फायदा घेऊन विकाव्यात. हंगामानुसार उत्पन्न जमा करून घ्यावे.

गावोगाव जाऊन किती कुणबी आहेत. त्या कुणब्याची परिस्थितीचा विचार करावा. शेती करण्यासाठी सर्व प्रकारे मदत करावी. कर्जापोटी दिलेले पैसे हळूहळू परत घ्यावेत. अशाप्रकारे छत्रपतींनी शेतकऱ्यांविषयीची तळमळ या पत्रात व्यक्त केलेली आहे.

**१.२ आशा-निराशेचे क्षण :-**
हा पाठ यशवंतराव चव्हाण यांच्या ऋणानुबंध या ग्रंथातून घेतलेला आहे. यशवंतराव चव्हाण आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत. नवनिर्मित महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होते. भारताचे उपपंतप्रधानही होते. आपल्या आयुष्यातील आठवणी व भावपूर्ण अनुभव या पाठात प्रकट केले आहेत.

आई गरीबीचा संसार चालवून शिक्षण करीत होती. त्यांचे बंधू गणपतराव इंदौर संस्थानमध्ये शेती कसण्यासाठी गरोठ या गावी गेले. गणपतरावांचे स्नेहीमध्येच गावी परतले. हे ऐकून यशवंतरावांची आई गणपतरावांची काळजी करू लागली. १९३९ साली दुसऱ्या महायुद्धाबरोबरच हिंदुस्थानच्या राजकीय बाबतीत घडामोडी सुरू झाल्या. त्यावेळी यशवंतरावांची विचारसरणी जहाल झाली होती. याच काळात भारत छोडो या आंदोलनात सहभाग घेतला. १९४३ ला एकेदिवशी यशवंतराव अतिशय निराश इ ााले. या दिवशी म. गांधीचे आगाखान पॅलेससमोर आमरण उपोषण चालू होते. त्यांची प्रकृती खालावली होती. यामुळे यशवंतराव निराश झाले होते. १९५७ च्या अखेरीस महाराष्ट्र राज्याची निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. हा काळ आशावादाने भरून गेला. संपूर्ण राजकीय आयुष्यात एका गोष्टीची खंत यशवंतरावांना लागून राहिली. ती गोष्ट म्हणजे ``राजकारणात यशस्वी होणे अवघड असते. कार्यकर्त्यांना जपावे लागते. अल्पसंख्याकांच्या मनाची जपणूक वर्षानुवर्षे करावी लागते. यातील काही मोठ्या लोकांच्या महत्वकांक्षेला थोडासा ओरखडा लागला की ही माणसे फणा उभारतात. हा माणसाचा स्वभाव पाहिला की मी निराश होतो." असे यशवंतराव म्हणतात.

**१.३ अक्षराचं बेट :-**
हा पाठ चंद्रकुमार नलगे यांचा ललित गद्य आहे. या लेखातून ग्रामीण जीवनातील निसर्ग, धार्मिक भावना, श्रद्धा जीवनाविषयक दृष्टीकोन यांचे

दर्शन घडते. गावातील वरची शाळा-खालची शाळा नि वरच्या शाळेचा अधिकार खालच्या शाळेवर आहे हे दिसून येते. खालची शाळा मुलांना लळा लावी. सुंदर बाग, गारवेलीची कमान, नाना रंगाच्या कर्दळी, चारी कोपऱ्यावर बोरूची उंच बेटं. याच बोरूनी सगळ्या पोरांच्या हाताला वळणं लावली पेनाचा शोध लागायच्या अगोदर शाळेत बोरूचेच पेन नि शाईचे दौत होते. बोरूची बेटे अद्भूत वाटायची. शाळेच्या मागच्या परसात फुलणारा पारिजात, देऊळ, जळत राहणारा लामणदिवा, गुलमुसाची फुले, उंचे बेलाचे झाड, तांबडेवस्त्र, देवळातला महादेव भटजी हे सारे मुलांना भारी आवडे. वानरांचे कळप गावात आल्यानंतर येणारी मजा, अभ्यासचुकवी मुले गुरुजीच्या टेबलावर प्राजक्त फुलांचा ढीग ठेवत होते. गुरगुरणाऱ्या गुरुजींचा ससा होई. श्रावणातील मजा, असे विविध अनुभव नलगे यांनी रेखाटलेले आहेत.

### १.४ वालचंद म्हणजे एक संस्था :-

नव्या पिढीला प्रेरणा देण्याच्या हेतूने उद्योगपती वालचंद हिराचंद गांधी यांचे चरित्र प्रेरणादायी आहे. हे चरित्र अरिंवद ताटके यांनी रेखाटले आहे. १३ सप्टेंबर १९२७ साली वालचंद यांनी चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना केली. १९३९ पर्यंत अकरा संस्थावर त्यांनी संचालकपदी काम केले. १९५० नंतर प्रकृती अस्वास्थामुळे विश्रांती घेतली.

चित्रपट, हुरडा पार्टी यातही आनंदाने सामिल होत होते. आपल्याकडून सेवकांची अपमान होणार नाही याची ते खबरदारी घेत. धंद्यात मिळालेला पैसा त्यांनी कधीही धार्मिक कार्यात वापरला नाही. प्रवासाप्रमाणे वाचनाचीही त्यांना आवड होती. देशहिताचा विचार, स्वावलंबी, आपल्या राष्ट्राचा गौरव व्हावा, पैशापेक्षा चांगले काम व्हावे, असे त्याचे ध्येय होते. वालचंद हिराचंद ही व्यक्ती नव्हती तर एक संस्था होती.

### १.५ प्राण्यांचे गोकुळ :-

डॉ. प्रकाश आमटे हे बाबा आमटे यांचे चिरंजीव आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा येथे आदिवासीच्या विकासासाठी मोठा प्रकल्प उभा केला आहे. आदिवासीसाठी दवाखाना, शिक्षण, कुटीरोद्योग आदी मार्गानी प्रयत्न केले. जंगलात जखमी झालेले पक्षी, प्राणी यांच्यावरही आमटे यांनी उपचार केले. अस्वल, वाघ, अजगर, माकड, हरीण इत्यादी प्राण्यांचा सांभाळ केला. दोन लाल माकडे आदिवासींनी मारली होती. त्यातील एक मादीला चिकटलेले पिल्लू आमटे पती-पत्नींनी त्याचा केलेला सांभाळ. कुणीतरी दिलेले हरीणाचे पिल्ली, नेगल (वाघ), नेगळी (वाघिण) मुन्ना नावाचा बिबट्या, नेगल-नगलीचे हेमल नावाचे पिल्लू, या सर्वांसोबत आलेले अनुभव या पाठात रेखाटलेले आहेत. प्राण्यांचे अनाथालय चालवित होते. आर्थिक जबाबदारी अनेकांनी पेलली होती. प्राण्यांचे बळी जाऊ नयेत. या भावनेनी प्राण्यांचे गोकुळ उभे केले होते.

### २. गद्य वेच्यांतून निर्माण झालेले प्रश्न :-

पाच प्रकरणातून कोणते कोणते प्रश्न निर्माण झाले आहेत याचा आढावा इथे घेतलेला आहे. सामाजिक, राजकीय, भावनिक इत्यादी प्रश्नांचा विचार इथे केलेला आहे.

### २.१ रयतेचा वाटा रयतेशी द्यावा :-

या पाठात छत्रपती शिवाजी महाराजांची राजकीय दृष्टी या पाठातून दिसून येते. सरकारी अधिकारी कसे असावेत? त्यांनी कसे वागावे? त्यांचा समाजाशी सहभाग कसा असावा? या प्रश्नांवर प्रकाश पडतो. छत्रपतींनी किती विचारपूर्वक रयतेची काळजी घेतलेली आहे हे दिसून येते. एक आगळा वेगळा राजा, रयतेचा राजा, कसा असावा? याचे ज्वलंत उदाहरण छ. शिवाजी महाराज होते. या पत्राद्वारे विविध प्रशासकीय व राजकीय बाबींवर प्रकाश पडतो.

### २.२ आशा-निराशेचे क्षण :-

यशवंतराव चव्हाण हे अतिशय भावनिक होतात-आपला भाऊ इंदौरहून कधी परतेल, याची चिंता त्यांना लागलेली ओ. तसेच महात्मा गांधी उपोषणास बसले असता त्यांची प्रकृती खालावली होती. याचीही चिंता त्यांना लागून राहिली. भारत छोडो आंदोलनातही त्यांनी सहभाग घेतला. येथे परदेश दौऱ्यात गेल्यानंतर त्यांना भारतातून परत येण्यासाठी फोन आला. यशवंतराव भारतातील निवडणुकात लोकशाहीची प्रक्रिया पार पाडण्यासाठी आंनदाने परत आले.

**२.३ अक्षराचं बेट :-**

या पाठात चंद्रकुमार नलगे यांनी ग्रामीण भागातील जीवनावर प्रकाश टाकलेला आहे. अक्षरे कशी गिरविले यांचे वर्णन केले आहे. शाळा कशी होती? याचेही दर्शन घडविलेले आहे. मंदिर, भटजी, पूजा, बेलाचे झाड याचे वर्णन मनाला भावते. एक वेगळीच माया लागून राहते.

**२.४ वालचंद म्हणजे एक संस्था :-**

वालचंद यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विविध संस्थांचा कारभार केला. वालचंद ही व्यक्ती नसून संस्था आहे. अनेक प्रश्नांवर मात करून मदत कार्य केले. अनेक उद्योगधंदे यशस्वीपणे उभे केले. अनेक नवीन कल्पना त्यांनी अंमलात आणल्या. सेवकांचा अपमान कधीही केला नाही. कोणत्याही संस्थेचे संस्थान होऊ दिले नाही. भौतिक प्रगतीवर अधिक लक्ष त्यांनी केंद्रित केले. सोलापूर समाचार व केसरी नियमितपणे वाचत.

**२.५ प्राण्यांचे गोकुळ :-**

प्रकाश आमटे यांनी हेमलकसा येथे आदीवासींच्या उन्नतीसाठी सुरू केलेल्या योजना प्रेरणादायी आहेत. त्या जंगलातील प्राण्यांचे त्यांनी गोकुळ उभे केले. प्राण्यांचे अनाथालय सुरू केले. जखमी प्राण्यांवर उपचार केले. वन्य प्राण्यांच्या जीवनात आनंद आणला. प्राण्यांच्या प्रश्नांवर मायेने उपचार व अभ्यास केला. अशाप्रकारे वरील गद्यपाठातून सामाजिक, राकीय, भावनिक जाणिवा प्रकट झालेल्या आहेत.

**३ गद्य वेच्यातून प्रकट झालेला सुखानुभव :-**

खालील प्रमाणे पाठातून कोणता सुखानुभव प्रकट झाला ते आपण पाहू.

**३.१ रयतेचा वाटा रयतेशी द्यावा :-**

या लेखात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय व प्रशासकीय भूमिकेवर प्रकाश पडतो. आजकाल किती भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. किती भानगड्या दिसत आहेत. आजच्या या बिघडलेल्या अधिकारी व राजकीय नेत्यांच्या डोळ्यात छ. शिवाजी महाराजांचा उपदेश आंजन घालणारा आहे. हा सुखानुभवच आहे.

**३.२ आशा-निराशेचे क्षण :-**

या पाठात यशवंतराव चव्हाण यांनी स्वातंत्र्य लढ्यात घेतलेली भूमिका महनीय आहे. त्यांचे विचार प्रेरणा देणारे आहेत. म. गांधींची तबीयत बरी नाही. ही बाब यशवंतरावांना खटकते नि मनात निराशा पसरते. ही निराशा मानवी मनात निर्माण होणे म्हणजेच सुखावह बाब आहे. भारत छोडो आंदोलनात यशवंतरावांचे भाग घेणे समस्त मानवी जीवनाला प्रेरणा देणारी घटना आहे. ही घटना सुखावह आहे.

**३.३ अक्षराचं बेट :-**

या पाठात चंद्रकुमार नलगे यांनी शाळा व शाळेभोवतालचा परिसर किमी सुंदर आहे हे रेखाटलेले आहे. गुलमुसाची देखणी फुले, प्राजक्ताची फुले, इत्यादींचे वर्णन मनाला सुख देणारे आहे. निसर्गात माणूस कसा विरघळून जातो याचा एक चांगला नमुना म्हणून या लेखाचा उल्लेख करता येईल.

**३.४ प्राण्यांचे गोकुळ :-**

प्राण्यांवर दया करणे, त्यांना सांभाळणे, औषधोपचार करणे, प्राण्यांत रममाण होणे, प्राण्यांचे अनाथालय सुरू करणे या घटना सुख देणाऱ्या आहेत. डॉ. प्रकाश आमटे यांनी प्राण्यांचे गोकुळ उभे केले ही बाब सुख देणारी आहे.

**३.५ वालचंद म्हणजे एक संस्था :-**

या पाठात वालचंद यांनी उद्योगक्षेत्रात केलेल्या कामगिरीचा आढावा घेतलेला आहे. धंद्यात मिळालेला पैसा वालचंद तो पैसा पुन्हा धंद्यातच वापरत होते. कोणतेही धार्मिक थोतांड त्यांनी उभे केले नाही. ही बाब सुखावह आहे. अशाप्रकारे वरीलप्रमाणे प्रकट झालेल्या भावना सुख देणाऱ्या आहेत.

**४. गद्य वेच्यांतून प्रकट झालेला दुःखानुभव :-**

मानवी जीवनात अशा काही घटना घडतात की त्यायोगे मानवी जीवनात दुःखाची छाया पसरते. माणूस दुःखाला सामोरे जाण्यासाठी सज्ज होतो. अशा कोणत्या घटना घडलेल्या आहेत की त्यायोगे पात्रांच्या जीवनात दुःख आलेले आहे. आई गरिबीचा संसार चालवित होती. इंदौर संस्थानात गेलेले गणपतराव परत कधी येतील? अशी चिंता यशवंतरावांच्या मनात निर्माण झालेली आहे. आईचा जीव वाऱ्यावर उडाला. काही आठवड्यांनी यशवंतरावाचे भाऊ गणपतराव परत आले. अंगावर खाकी कपडे, अर्धी पँट घातलेला व थकून गेलेल्या भावाची मूर्ती पाहून बराच काळ दबलेल्या निराशेने अश्रूंना वाट करून दिली ही घटना दुःख देणारी आहे.

## ५. नवीन शब्दांची ओळख :-

या गद्य वेच्यांतून विद्यार्थ्यांना अनेक नव्या शब्दांची ओळख होते. क्रिया-शपथ, कामावीस-वसुली, वतु-प्रमाणे, हुजरेने-कौशल्यतेने, उसूल-जमा/नियम, जात-आरोप, येत-मुद्दल, तवाना-सावध, तुल-समान, लारी-चांदीचे नाणे, रेवेशी-वहिवाट, नफर-उंटावरील कर. वरीलप्रमाणे शिवकालीन मराठी भाषेचा नमुना आपल्याला पहायला मिळतो. आजही वरील अनेक शब्द पारसी भाषेत दिसून येतात.

## ६. गद्य वेच्यांतील जीवनानुभवाचे दर्शन :-

**६.१** रयतेचा वाटा रयतेला मिळावा ही छत्रपतींची दृष्टी मानवी जीवनाला उभारी देणारी आहे. जनतेचे सेवक कसे असावेत याचे दर्शन त्यांच्या पत्रातून घडते. रयतेच्या काडीची काळजी राजांनी घेतलेली आहे. शेतीला प्राधान्य देणारा राजा कृषीप्रधान विचार सरणीचा आहे. आजही हे विचार भारतीय कृषी संस्कृतीला प्रेरणा देणारे आहेत.

**६.२** ``माझी प्रवृत्ती व प्रकृती आशावादी आहे. संकटकाळी मी दबून जाणारा नाही. पण तरीही दैनंदिन जीवनात कधी आशावादी तर कधी निराशावादी व्हावे लागते. अर्थात, असे प्रसंग किंचित काळ टिकणारे असतात." यशवंतराव चव्हाण यांचे विचार संबंध मानवी जीवनाला प्रेरणा देणार आहेत.

**६.३** देवळातील घंटा वाजली की अवघा परिसर प्रसन्न होवून जायचा. गाभाऱ्यात शांतपणे जळत राहणारा लामण दिवा, दारातलं उंच बेलाचं झाड आणि तांबडं वस्त्र असलेले उघडे, बेला-फुलांची परडी घेतलेले महादेव भटजी. हे दृश्य मनात रेंगाळते. बेलाच्या झाडाशी मुलाचं काही वेगळच नातं होतं. मुलांना आपलं मन मोकळं करण्याचं ते विश्वासाचं ठिकाण वाटे. नलगे यांच्या या ललित गद्यातून ग्रामजीवनातील निसर्ग, भावना, श्रद्धा, त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन याचे दर्शन घडते.

**६.४** स्वतःच्या लाभापेक्षा देशहिताचा विचार वालचंद करतात. देशातील तरुण शेतकऱ्यांचा आणि कारागिरांचा विचार अधिक करतात. `साहेबाला साधले ते आपल्यालाही साधलेच पाहिजे. त्यात अवघड असे काही नाही असे ते म्हणत.' सर्व बाबतीत आपण स्वावलंबी असावे आणि तेच आपले राष्ट्रीय ध्येय असावे. ही त्यांची भूमिका जीवनाला कलाटणी देणारी आहे.

**६.५** प्राण्यांचे बळी जाऊ नयेत या भावनेनी प्रकाश आमटे यांनी प्राण्यांचे गोकुळ उभे केले. वन्य प्राण्यांनी निरपेक्ष प्रेम शिकविले. आमच्यातला एकटेपणा निघून गेला. हेमलकसा येथे निर्माण झालेल्या प्रकल्पाचे श्रेय त्यांनी प्राण्यांना दिलेले आहे. प्राण्यांतून प्रेम शोधणे ही बाब मानवी जीवनाला प्रेरणा देणारी आहे.

## ७. गद्य वेच्यांतून निर्माण झालेले विचार मौक्तिके :-

अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या गद्यवेच्यांतून विचार मौक्तिके दिसून येतात. त्यांचा परामर्श इथे घेतलेला आहे. विचार मौक्तिके खालीलप्रमाणे आहेत.

**७.१** निराशेच्या काळात माणूस पुष्कळ वेळा अंतर्मुख होतो.
**७.२** निराशेचे क्षण जीवनाला शक्ती देणारे असतात.
**७.३** असे दबून कसे चालेल?
**७.४** निराशा हा कदाचित जीवनातील एक आवश्यक भाग आहे.
**७.५** प्राजक्त म्हणजे तरुवरांचा तरू.
**७.६** संस्थाचे संस्थान होऊ देऊ नका.
**७.७** साहेबाला साधले ते आपल्यालाही साधले पाहिजे.
**७.८** जीवनात आशा निराशेचा खेळ अटळ असतो पण तेच खरे जीवन असते.
**७.९** गुलमुसाशिवाय मी म्हणजे चांदणं हरवलेलं आभाळच!
**७.१०** सगळ्या पोरांच्या हाताला वळणं लागली ती या बोरूनं!
**७.११** जीवनाचा आस्वाद रसिकतेने घ्यावा.
**७.१२** राखावी बहुतांची अंतरे हे त्यांच्या जीवनाचे एक सूत्र होते.
**७.१३** माणसाप्रमाणेच वन्य प्राण्यांची सेवा करणे महत्वाचे आहे.

अशाप्रकारे गद्य वेच्यांतून विचार मौक्तिके प्रकट झालेले दिसून येतात. ही मौक्तिके संस्कारप्रद असून जीवनाला दिशा देणारे आहेत. माणूस निर्माण करणारे आहेत.

### ८. गद्य वेच्यातून प्रकट झालेले व्यक्तीचित्रण :-

तीन महान व्यक्तींच्या कार्याची ओळख या वेच्यातून दिसून येते.

### ८.१ छत्रपती शिवजी महाराज :-

छ. शिवाजी महाराजांची थोरवी या पत्राद्वारे दिसून येते. आजच्या भद्र राजकीय अवस्थेला शिवाजी महाराजांचे पत्र दिशा व मार्गदर्शन करणारे आहे. या पत्रात कुणब्यांची काळजी वाहणारे कृषी संस्कृतीचे धीरोदात्त मनाचे दर्शन घडते. कृषी विकास व्हावा नि कृषी संस्कृतीतील सारेच घटक विकास प्रक्रियेत सामील व्हावीत ही महाराजांची दृष्टी इथे दिसते. शेतकरी संपन्न व्हावा ही छत्रपतीच्या व्यक्तिमत्वाची खूण आहे. हे दर्शन त्यांच्या व्यक्तिमत्वातून घडते.

### ८.२ यशवंतराव चव्हाण :-

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व भारताचे उपपंतप्रधान असा दैदीप्यमान राजकीय वसा निर्माण करणाऱ्या यशवंतरावांचा पिंडच मुळी सर्वधर्मसमभावाचा होता. घरच्या गरिबीला कोठेही आड येऊ न देता हा माणूस इतिहास निर्माण करतो. स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होतो. ह्या गोष्टी आज भारतीय मनाला प्रेरणा देणाऱ्या आहेत. यशवंतरावांचे जीवन काळ्यामातीतून फुलले. आज या देशातील तमाम तरुणांना त्यांचे व्यक्तीमत्व प्रेरणा देणारे आहे.

### ८.३ वालचंद हिरालाल गांधी :-

वालचंद हिरालाल गांधी यांनी स्वप्रयत्नातून उभे केलेले उद्योगधंदे म्हणजे त्यांच्या अथक परिश्रमाचे द्योतक आहे. वालचंद यांनी चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना केली. व्यापारी व उद्योजकांना एकत्रित आणले. उद्योगक्षेत्रात धडपडणारा माणूस कला व साहित्याचाही आस्वाद घेतो. अकरा संस्थावर त्यांनी संचालकपदी काम पाहिले. संस्थेचे संस्थान होऊ दिले नाही. ही त्यांची दृष्टी आज उद्योगक्षेत्राला दिशा देणारी आहे.

### ९. गद्य वेच्यांचा परामर्श :-

सृजनरंग या पुस्तकात बी.ए. भाग-१ साठी समाविष्ट केलेल्या दुसऱ्या सत्रातील गद्य वेच्यांचा आढावा घेत असताना काही तरंग मनात उमटले. त्याचाच परामर्श इथे घेतलेला आहे.

एकूण पाच लेख या सत्रात आहेत. तीन लेख व्यक्तींचे दर्शन घडविणारे आहेत. एक लेख ललित गद्याचा सुंदर नमुना आहे. एक लेख प्राणी जगताचे दर्शन घडविणारे आहे. हे पाचही लेख विद्यार्थ्यांची अभिरूची वाढविणारे आहेत. संस्कार करणारे आहेत. मनाचे कंगोरे स्पष्ट करणारी आहेत. विद्यार्थ्यांच्या मनात उभारी देऊन नवी विचारसरणी निर्माण करणारे लेख आहेत. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. `प्राण्यांचे गोकुळ या पाठात मेलेल्या माकडीणीला तिचे पिल्लू तिच्या पोटाला धरले होते. आदीवासी घेऊन आले' हा मजकूर विसंगत वाटतो. एवढेच बाकी सर्व ठीक आहे.

### १०. निष्कर्ष :-

१) गद्य वेच्ये माणुसकीचे दर्शन घडविणारे आहेत.
२) विद्यार्थ्यांवर संस्कार करणारे आहेत.
३) गद्यवेच्यांतून देशप्रेम, जिद्द, एकात्मता, भावनिकता, भूतदया या गुणांची जोपासना होते.
४) गद्यवेच्यांतून प्रकट होणारे अनुभव चिरकाल टिकणारे आहेत.
५) गद्यवेच्यांची निवड उत्कृष्ट झालेली आहे.
६) गद्यवेच्यांतून जीवनानुभवाचे दर्शन घडते.
७) गद्यवेच्ये विद्यार्थ्यांच्या (वयोगटाला) विचारांना समरूप होणारे आहेत.
८) गद्यवेच्यातून प्रकट होणारा भावार्थ व्यापक आणि सर्वव्यापी आहे.

### ११. समारोप :-

या शोधनिबंधात गद्यवेच्यांतून प्रकट होणारा आशय रेखाटलेला आहे. या गद्यवेच्यांतून निर्माण झालेले प्रश्न कोणते आहेत याचा आढावा घेतलेला आहे. गद्यवेच्यातून प्रकट होणारा सुखानुभव व दुःखानुभव याचा शोध घेतला आहे. नवीन शब्दांची जाणीव रेखाटली आहे. गद्यवेच्यातून प्रकट होणाऱ्या जीवनानुभवाचे दर्शन रेखाटले आहे. गद्यवेच्यातून कोणते विचार मौक्तिके प्रकट होतात याचा शोध घेतलेला

आहे. व्यक्तीमत्व तपासले आहे. गद्यवेच्यांचा परामर्श घेऊन निष्कर्षांची मांडणी केलेली आहे. अशाप्रकारे या शोधनिबंधात अजून उणीवा असतील याची शक्यता नाकारता येणार नाही.